फ) कायदा, नियम व पोटनियम यानुसार अपात्र ठरल्यास.

ग) बँकेने Right of lien चा अधिकार वापरल्यास.

घ) बँकेच्या येण्यापोटी भागाच्या जमा रक्कमेवर असलेल्या हक्कापोटी संपूर्ण भाग रक्कम वळती करुन घेतल्यास.

**२५) भाग दाखला :**

१) प्रत्येक व्यक्ती सभासद म्हणून स्वीकृत झाल्यावर त्या व्यक्तीने घेतलेल्या भागाबद्दल भाग दाखला विनाशुल्क मिळण्यास पात्र होईल. भाग दाखल्यावर घेतलेल्या भागांचा उल्लेख असेल व त्याचे अनुक्रमांक असतील. भाग दाखल्यावर बँकेचे अध्यक्ष अथवा अधिकार दिलेले संचालक व मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्या स्वाक्षऱ्या असतील. तसेच बँकेची मोहोर (सील) त्यावर असेल.

२) जर कोणताही भाग दाखला हरवला, गहाळ झाला, नष्ट झाला तर त्याऐवजी रक्कम रु.१००/- शुल्क भरल्यानंतर दुसरा भाग दाखला दिला जाऊ शकेल. परंतू त्यासाठी सभासदाने भाग दाखला गहाळ झाल्याबाबतचा, हरवल्याबाबतचा, नष्ट झाल्याबाबतचा पुरावा सादर करणे आवश्यक आहे. तसेच सभासदाने त्यासाठी बँकेस आवश्यक तो इंडेमनिटीबॉण्ड देणे आवश्यक आहे.

**२६) नामांकन :**

सभासदास आपले पश्चात बँकेतील हक्क, जबाबदारी घेणेसाठी वारसाची नेमणूक करता येईल. वारस नेमणेबाबत विहित नमुन्यात अर्ज केला पाहिजे व त्याची नोंद बँकेचे नोंदणीकृत कार्यालयात ठेवलेल्या वारस नोंदणी रजिस्टरमध्ये झाली पाहिजे. जर वारस बँकेचा सेवक असेल तर मा.संचालक मंडळाची पूर्व परवानगी घेतली पाहिजे. कोणत्याही वेळी अगोदर नोंदलेले वारस पत्र मागे घेऊन नवीन वारस पत्र दाखल करता येईल. मात्र त्यासंबधीची लेखी माहिती बँकेस दिली पाहिजे. तसेच नवीन वारस पत्र दाखल करतांना प्रत्येकवेळी रु.१०/- फी द्यावी लागेल.

**२७) सभासदाचा मृत्यू :**

सभासदाचे मृत्यूनंतर त्या सभासदाच्या भागांची रक्कम नेमलेल्या वारसांकडून जरुर त्या सर्व कागदपत्रांच्या पुर्ततेनंतर १२ महिन्यांचे आत दिली पाहिजे. वारस नेमले नसेल तर संचालक मंडळास जो त्याचा कायदेशीर वारस आहे अथवा जो मृत्यू पावलेल्या सभासदांचा कायदेशीर प्रतिनिधी आहे अशी खात्री असेल त्यास बँक रक्कम देईल. अशावेळी संचालक मंडळाने ठरविलेल्या अटीनुसार योग्य तो इंडेमनिटी बॉण्ड द्यावा लागेल. अशा रक्कमेत भागभांडवल, लाभांश, ठेवी व त्यावरील व्याज अथवा कोणत्याही प्रकारची मयत सभासदास देय असलेली रक्कम यांचा समावेश होईल. अशी रक्कम देतांना बँकेची येणे असलेली रक्कम वजा केली जाईल. जर एखाद्या सभासदाने वारस नोंद केली नसेल व वारसासंदर्भात विवाद निर्माण झालेस अशा ठिकाणी सक्षम न्यायालयाकडून वारस दाखला द्यावा लागेल.